महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम२६८९/१३६२/[३३२२]/२१

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ नोव्हेंबर १९८९

वाचा :- शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम१२७२/४८००४/इ, दिनांक १८. ११. ७२

शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम१३७५/३५५५/२३, दि. १०. २. ७६

शासन परिपत्रक क्र. पीआरसी१०७६/२४११/२३, दि. ३१. १. ७७

शासन परिपत्रक क्र. पीआरसी१०७७/२७०३/सीआर२७३२/२३, दि. १२. ९. ७८

शासन परिपत्रक क्र. पीआरसी१०७६/२४११/सीआर१९२३/२३, दि. १९. ६. ७९

शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम२६८७/२८२८, दिनांक २६. ५. ८७

परिपत्रक :- मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८च्या कलम ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायती तर्फे [प्रत्येक वित्तीय वर्षी] विहित करण्यात येईल अशा तारखेस, वेळी व ठिकाणी ग्रामसभेच्या निदान २ बैठका घेण्यात येतील आणि जर सरपंच किंवा त्यांच्या अनुपस्थितीत उपसरपंच पुरेशा कारणाशिवाय अशा दोन बैठकापैकी कोणतीही अेक बैठक घेण्यास चुकला तर तो सरपंच किंवा यथास्थिती उपसरपंच म्हणून चालू रहाण्यास किंवा पंचायत सदस्यांच्या उरलेल्या पदावधीसाठी त्या पदावर निवडला जाण्यास अनर्ह ठरेल व असे पुरेसे कारण होते किंवा नाही या प्रश्नावर जिल्हाधिका-यांचा निर्णय अंतिम असेल.

ग्रामसभेबाबत वर उल्लेख केलेल्या निरनिराळया परिपत्रकाव्दारे वेळोवेळी खुलासा करण्यात आलेला आहे. सदरहू आदेशांचा साकल्याने विचार करुन खालील-प्रमाणे आदेश काढण्यात येत आहेत :-

परिपत्रक क्र. व्हीपीएम१२७२/४८००४/इ, दि. १८. ११. ७२ :- बोंगिरवार समितीच्या शिफारस क्र. १८६ व १८७ च्या संदर्भात शासनाने असे नमूद [illegible] आहे की, कोणताही सरपंच ग्रामसभा घेण्यास चुकला तर सदरहू ग्रामसभा न घेण्यास पुरेसे कोणते कारण होते याचा खुलासा करण्याची संधी त्याला देण्यात येणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक सरपंच अथवा उपसरपंचाने विहित मुदतीत ग्रामसभा घेतल्या आहेत किंवा नाही यासंबंधी गट विकास अधिका-यांनी खात्री करुन घ्यावी.

परिपत्रक क्र. व्हीपीएम१३७५/३५५५/२३, दि. १०. २. ७६ :- ग्रामसभेच्या बैठका घेण्यात कसूर झाल्यास सरपंचाप्रमाणेच ग्राम सचिवास सुध्दा जबाबदार धरण्यांत येईल. तसेच मुख्य कार्यकारी अधिका-यानी ग्रामपंचायतीच्या सरपंच त्याचप्रमाणे सचिवावर ग्रामसभा योग्य त्या रितीने घेण्याबाबतची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. अशा सूचना देण्यात आल्याआहेत.

परिपत्रक क्र. पीआरसी१०७६/२४११/२३, दि. ३१. १. ७७ :- जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा व मासिक सभा नियमितपणे न घेणा-या सरपंच व ग्रामसेवकाविरुध्द कडक कारवाई करावी व ग्रामसभेबाबतचे अहवाल गट विकास अधिकारी अथवा मुख्य कार्यकारी अधिका-याना न पाठविल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात यावी. तसेच ग्रामसभा वेळेवर घेण्यासाठी प्रचार करण्यांत यावा.

परिपत्रक क्र. पीआरसी१०७७/२७०३/सीआर[२७३२], दिनांक १२. ९. ७८ :- सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यानी गट विकास अधिका-यांना अशी सूचना देणे आवश्यक आहे की, त्यांनी ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
- 8 DEC 1989
शाखा - GB
नि. उ. जि. जिल्हाधिकारी

...२

बैठकीसाठी जास्तीत जा स्त लोक हजर रहाण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी दयावी व योग्य ती उपाय योजना आखण्यांत यावी.

परिपत्रक क्र. पीआरसी१०७६/२४११/सीआर१९२३/२३, दि. १९. ६. ७९ :- ग्रामसेवकाने ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा घेण्यासंबंधीच्या सूचना योग्य त्या वेळी सरपंच व उपसरपंच यांना दयाव्या . प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च पूर्वी अशा ग्रामसभा ग्रामपंचायतीमध्ये घेण्यात आल्या किंवा नाही यासंबंधीचा अहवाल ग्रामसेवकाने गट विकास अधिका-याला दयावा. याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, जो सरपंच ग्रामसभा घेण्याच्या कर्तव्यात चुकेल त्याला यासंबंधीचे कारण देण्यास गट विकास अधिका-यांनी भाग पाडावे व ज्या ग्रामपंचायती, ग्रामसभा घेण्याच्या कर्तव्यात कसूर करतील त्या ग्रामपंचायतीची त्याचप्रमाणे त्या सरपंचाची नावे गट विकास अधिका-यांना ३१ मे पूर्वी मुख्य कार्यकारी अधिका-यानी सादर करावी. अशा प्रकारे ३१ मे पूर्वी यादी प्राप्त झाल्यानंतर ही नावे १५ जून पूर्वी जिल्हाधिका-यांकडे पाठविण्यात यावी. जिल्हाधिका-यांनी कर्तव्यात कसूर करण्यात आलेल्या सरपंच व उपसरपंच यांना यासंबंधीचे जाब १ महिन्याच्या आत सादर करण्याच्या सूचना दयाव्या व त्याच्यावर योग्य ती कारवाई का करण्यात येवू नये अशा प्रकारची नोटीस जिल्हाधिका-यांनी संबंधित सरपंचाना दयावी. त्यानंतर मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ७ अन्वये संबंधित सरपंच व उपसरपंच यांच्यावर जिल्हाधिका-यानी तात्काळ योग्य ती कारवाई करावी.

परिपत्रक क्र. व्हीपीएम२६८७/२८२८/ दि. २६. ५. ८७ :- या परिपत्रकात असे आदेश देण्यांत आले आहेत की, जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी यांनी ग्रामपंचायतीची सभा घेण्यात कसूर करणा-या सरपंचावर तत्काळ योग्य ती कारवाई करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

वं.श्री.कुळकर्णी

[ वं. श्री. कुळकर्णी ]
सह सचिव, महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग

प्रति,

१. सर्व आयुक्त,
२. सर्व जिल्हाधिकारी,
३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
४. सर्व गट विकास अधिकारी
५. उपमुख्य लेखा अधिकारी, पुणे/औरंगाबाद/नागपूर
६. ग्राम विकास विभागातील सर्व कार्यासने.